कृषी व पदुम विभागांतर्गत राज्यातील चारही कृषी विद्यापीठे आणि महाबीज, अकोला यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत-

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण १५१७/प्र.क्र.३७२/६-ए

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
५वा मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १२ सप्टेंबर, २०१७

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७/१२/२०१६

प्रस्तावना :-

राज्य शासनाच्या विविध विभागात / विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/महामंडळे येथील पदांवर विविध विभागांकडून प्रतिनियुक्तीने नेमणूका केल्या जातात. शासकीय कर्मचाऱ्यांची सेवा प्रवेश नियमातील तरतूदींनुसार तसेच प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील मंडळ/महामंडळ, निमशासकीय कार्यालये (नगरपालिका/महानगरपालिका), अन्य राज्य शासनाच्या वा केंद्र शासकीय कार्यालयातील / अधिपत्याखालील महामंडळे/कंपन्या इत्यादी मधील पदे थेट नियुक्तीने न भरता राज्य शासकीय सेवेतील त्याच अथवा समकक्ष पदावरुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते.

२. प्रतिनियुक्तीने करण्यात येणाऱ्या नेमणूकांमध्ये एकसमानता रहाणे, सुसूत्रता असावी व प्रशासनिक शिस्त रहावी यादृष्टीने याबाबत सर्वसमावेशक धोरण उपरोक्त संदर्भाधीन सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आलेले आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद ६ येथे प्रतिनियुक्तीने नियुक्तीसंदर्भात कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे. याच परिच्छेद ६च्या उप परिच्छेद (५) अनुसार गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांच्याबाबतीत संबंधित विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य समिती गठीत करावयाची आहे.

३. कृषी व पदुम विभागांतर्गत राज्यातील चारही कृषी विद्यापीठे आणि महाबीज, अकोला यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी समिती गठीत करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. प्रस्तुत शासन निर्णयातील अटी व शर्ती, तरतूदी विचारात घेऊन, कृषी व पदुम विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे आणि महाबीज महामंडळांतर्गत पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीकरीता अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६च्या शासन निर्णयातील परिच्छेद ६(५) मध्ये नमूद केल्यानुसार, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत राज्यातील चारही कृषी विद्यापीठे आणि महाबीज, अकोला या महामंडळाकडील पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याकरीता खालीलप्रमाणे त्रिसदस्य समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनांम	समितीवरील पदनाम
१	सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (कृषी)	अध्यक्ष
२	संबंधित कृषी विद्यापिठाचे कुलगुरु वा कुलगुरु यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी / व्यवस्थापकीय संचालक (महाबीज)	सदस्य
३	सह सचिव / उप सचिव (कृषी विद्यापीठे)	सदस्य-सचिव

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१४१६२५०६८१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Devappa Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2017.09.14 16:16:59 +05'30'

(दे.आ. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब,भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे
२. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी
३. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,
४. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी,
५. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बीयाणे महामंडळ, अकोला
७. उप सचिव (कार्यासन-१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव आणि कक्ष अधिकारी, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,
९. कार्यासन ६-ए, संग्रहार्थ.